**नियमित दिवाणी अपिल क्र. ९०/२०१६**

MHSI010003782016

अहमद खान वि. कोकण रेल्वे कार्पोरेशन

**<u>निशाणी ३३ खालील आदेश</u>**

अर्ज व म्हणणे वाचले. अभिलेखाचे अवलोकन केले. निशाणी ३३ प्रमाणे अपिलार्थी याने दाव्यात मागितलेली दुरुस्ती विहित मुदतीत न केल्याने व खर्चाची रक्कम भरणा न केल्याने सदरचा आदेश रद्द व्हावा याकरिता प्रस्तुतचा अर्ज उत्तरवादी यांनी दिलेला आहे. सदर अर्जास अपिलार्थी यांनी म्हणणे देऊन कायद्यात तशी तरतूद नसून आज रोजी खर्चाची रक्कम भरुन दुरुस्ती करण्याची तयारी दर्शवली. निश्चितच उत्तरार्थी यांनी खर्चाची रक्कम भरणे व दुरुस्ती करणेस कुचराई केलेली आहे. परंतु अपिलार्थी यांना दुरुस्ती करण्याची संधी न दिल्यास प्रकरण गुणदोषावर निर्णित करणे कठिण होईल. दुरुस्ती करण्यास अपिलार्थी यांस संधी दिल्यास उत्तरार्थी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे प्रकरणाची गुंतागुत टाळावी याकरिता सदरचा अर्ज न्यायाच्या दृष्टीने नामंजूर करणे योग्य होईल. करिता खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

१. आदेश नामंजूर करण्यात येतो.
२. खर्चासंबंधी आदेश नाही.

DESHMUKH VIDYA SHARADRAO

Digitally signed by DESHMUKH VIDYA SHARADRAO
Date: 2025.07.23 18:04:01 +0530

**सिंधुदुर्ग – ओरोस**
**दिनांक : २३/०७/२०२५**

**(व्ही. एस्. देशमुख)**
**जिल्हा न्यायाधीश–२,**
**सिंधुदुर्ग–ओरोस.**